INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 3 | APRIL – 2021

# ''मेळघाट मधील कोरकू आदिवासींचे स्थलांतर थांबविण्यात म. गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे योगदान''

मुकुंद पांडुरंगजी देशमुख
अशिस्टंट मॅनेजर, करितास इंडीया, न्यु दिल्ली.

**सारांश (Abstract)**

रोजगाराच्या शोधात स्थलांतर ही भारतातील फार मोठी समस्या आहे. ही समस्या दुर करण्यासाठी स्वतंत्र भारताच्या इतीहासात अनेक योजना राबविल्या गेल्यात मात्र त्याला फारसे यश प्राप्त होवू शकेले नाही. त्यामुळेच ग्रामीण भागातून शहरी भागात होण्याऱ्या स्थलांतरामुळे शहरांमध्ये सुध्दा अनेक समस्या निर्माण झाल्यात. स्थलांतरीत काळात नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. एकतर गावकडेच सोडून दिलेले वृध्द आई–वडील, लहान मुले यांच्या समस्या व स्थलांरतीत जागेत पुरेशा सोयी अभावी निर्माण होणाऱ्या समस्या निराळया असतात. साधारणतः पुर्वी हे स्थलांतर गावाकडून शहराकडे होत असायचे. आदिवासी आपला भुभाग सोडून शहराकडे स्थलांतर करीत असल्याच्या फारश्या नोंदी उपलब्ध नाहीत. यामागे आदिवासींची जीवनपध्दती हे प्रमुख कारण होते. फार कमी गरजा, साधे राहणीमान, भौतिक सुविधांविषयी अनास्था, आणि जंगलांमध्येच जीवन जगण्याची पुरेशी साधन सपंत्ती उपलब्ध असणे यामुळे आदिवासी रोजगाराच्या शोधात स्थलांतर करीत नसे. मात्र अलिकडच्या काळात शासन निर्णय तथा आदिवासींच्या जीवनात आमुलाग्र झालेले बदल त्यांना सुध्दा स्थलांतरास भाग पाडत असल्याचे दिसून येते. याअनुषंगाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेने महत्वाची भुमिका पार पाडली आहे. स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध झाल्यामुळे रोजगाराच्या शोधात होणारे स्थलांतर बऱ्याच प्रमाणात थांबले आहे. याविषयीचा मागोवा प्रस्तूत शोध निबंधातून घेण्यात आला आहे.

**कि वर्ड–** मगांराग्रारोह योजना, रोजगार शाश्वती, स्थलांतर, आर्थिक विकास, आरोग्यविषयक विकास.

## ▪ प्रस्तावना

भारत सरकारने सन 2005 मध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा पारित करून ग्रामीण भागातील कुटुंबांना वर्षातील 100 दिवस रोजगाराची शाश्वती प्रदान करण्यासाठी दि.2 फेब्रुवारी 2006 मध्ये राष्ट्रीय गामीण रोजगार हमी योजना कार्यान्वीत केली. ग्रामीण घटकांसोबतच आदिवासींसाठी सुध्दा ही योजना वरदान म्हणून पुढे आली. अमरावती जिल्हयातील मेळघाट भागात कोरकू आदिवासींचे वास्तव्य मोठया प्रमाणात आहे. मेळघाट हा भाग सातपूडा पर्वत रांगांमध्ये स्थिरावला असून घनदाट जंगल, डोंगराळ भाग, यामुळे उपजावू जमिनीची कमतरता आढळून येते. तसेच हा भाग शासनाने व्याघ्र प्रकल्प म्हणून घोषीत केलेला असल्यामुळे मेळघाटमधे रोजगाराचा अभाव आहे. तसेच अन्य उदयोग धंदे नसल्यामुळे रोजगाराच्या शोधात स्थलांतर करण्याशिवाय

आदिवासींना पर्याय राहात नाही. प्रस्तूत शोध निबंधात कोरकू आदिवासींचे स्थलांतर थांबविण्यात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी (मगांराग्रारोह) योजनेचे कशा प्रकारे योगदान आहे यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

### ▪ शोध निबंधाचे उद्देश

**प्रस्तूत शोध निबंध पुढील उद्देशांवर आधारीत आहे.**

1. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा आढावा घेणे
2. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मेळघाट मधील अंमलबजावणीच्या सदयस्थितीचा आढावा घेवून त्याचे कोरकू आदिवासींचे स्थलांतर थांबविण्यामध्ये योगदान अभ्यासणे.

### ▪ पध्दतीशास्त्र

प्रस्तूत शोध निबंध प्राथमिक तथ्यावर अधारेला असून त्यासाठी मेळघाट मधील चिखलदरा तालुक्यातील चुरू गावाची निवड करण्यात आली होती. योजनेअंतर्गत चुरू गावातील एकूण 20 लाभार्थ्यांची मुलाखत घेवून विश्लेषण करण्यात आले आहे.

### ▪ मेळघाट एक दृष्टीक्षेप

मेळघाट हा भाग अमरावती जिल्हयात समाविष्ट असून त्यामध्ये मुख्यत्वे चिखलदरा व धारणी या तालुक्याचा समावेश केला जातो. मेळघाट हा भाग सातपूडा पर्वत रांगांमध्ये स्थिरावला असून घनदाट जंगलांसाठी प्रसिध्द आहे तसेच हा भाग व्याघ्र प्रकल्प म्हणून आरक्षित केलेला आहे. थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिध्द असलेले चिखलदरा हे गाव याच मेळघाटचा एक भाग आहे.

मेळघाट मध्ये चिखलदरा व धारणी या दोन तालुक्यांचा समावेश आहे. त्यापैकी चिखलदरा तालुक्यात एकूण 17,051 कुटुंब वास्तव्यास असून 98,561 लोकसंख्या आहे. तर धारणी तालुक्यात 21,132 कुटुंब वास्तव्यास असून 1,47,086 लोकसंख्या आहे. या दोन्ही तालुक्यांमध्ये आदिवासी जमातीचे प्रमाण सर्वाधिक असून अनुसुचीत जाती तसेच भटक्या व विमुक्त जाती काही प्रमाणात आढळून येतात. मेळघाट मधील आदिवासी जमाती मध्ये कोरकू, गोंड हया प्रमुख जमाती असून परधान, बलई, गवळी या जमाती सुध्दा काही प्रमाणात आढळून येतात.

### ▪ मेळघाट मधील रोजगाराची स्थिती–

मेळघाटचा बहुतांश भाग जंगलाने व्याप्त असून व्याघ्र प्रकल्पासाठी आरक्षित केलेला आहे. लागवडी लायक जमिनीचे प्रमाण येथे अत्यल्प आढळून येते. त्यामुळे कोरकू आदिवासींचे जीवन जंगलातील कंदमुळे, फळे गोळा करणे तसेच शिकार करणे यावर अवलंबून होते. अलिकडच्या काळात जंगलांसंदर्भात आलेले नवीन कायदे तथा नियम व व्याघ्र प्रकल्पासाठी मेळघाट हा भाग आरक्षित केल्यामुळे जंगलांमधील मुक्त भ्रमंतीवर प्रतिबंध घातल्या गेला. कृषी लायक जमिनीचा अभाव, उदयोग धंदे नसने त्यामुळे कोरकू आदिवासींना वर्षातील तीन ते चार महिन्यांपेक्षा अधिक दिवस रोजगार प्राप्त होत नाही. त्यामुळे आदिवासींना रोजगाराच्या शोधात हंगामी स्थलांतराशिवाय पर्याय नाही.

### ▪ मेळघाट मधील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची सदयस्थिती

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा दि. 7 सप्टेंबर 2005 ला पारीत करण्यात आला. या कायदयाची अंमलबजावणी करण्यासाठी दि. 2 फेब्रुवारी 2006 ला राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्यास प्रारंभ झाला असून पुढे दि. 2 ऑक्टोबर 2009 ला या योनजेचे नाव महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना असे करण्यात आले. प्रारंभी ही योजना निवडक 200 जिल्हयांमध्ये राबविली जात होती. कालांतराने टप्प्या–टप्प्याने ही योजना संपूर्ण देशात राबविण्यास प्रारंभ झाला.

### ▪ मगाराग्रारोह योजनेचे तत्व–

प्रत्येक ग्रामीण कुटुंबातील अकुशल काम करू इच्छिणाऱ्या प्रौढ सदस्यांना वर्षभरातून किमान 100 दिवसांच्या रोजगाराची हमी देणे

▪ **लक्ष–**

1. ग्रामीण भागातील असुरक्षित घटकांना सामाजिक सुरक्षा पुरविणे.
2. उत्पादक व टिकाऊ मालमत्ता मिळवून देणे.
3. नैसर्गीक स्त्रोतांना पुनरूज्जीवन मिळवून देणे.
4. स्त्रीया, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर सामाजिकदृष्टया व्यावर्तित गटाचे सबलीकरण करणे.
5. दारिद्रय निर्मूलनाच्या बहुतांशी योजनांच्या समन्वयातून विकेंद्रित नियोजन करणे.
6. पंचायतराज संस्थांच्या सबलीकरणातून तळागाळापर्यंत लोकशाहीची तत्वे रूजविणे.

▪ **मेळघाट मध्ये मगांराग्रारोह योजनेची अंमलबजावणी**

सन 2008 पासून अमरावती जिल्हयात योजनेला प्रारंभ झाला असून मेळघाट मध्ये सुध्दा ही योजना राबविल्या जाते. याकाळात मेळघाट मध्ये रोजगाराची स्थिती अतिशय बिकट होती. वर्षातील केवळ तीन ते चार महिन्यांपेक्षा अधिक काळ रोजगार प्राप्त होत नव्हता. त्यामुळे मेळघाट मधून कोरकू आदिवासींचे रोजगाराच्या शोधात मोठया प्रमाणात हंगामी स्थलांतर होत होते. मेळघाट मधील दोन्ही तालुक्यांमध्ये ही योजना प्रभावीपणे राबविल्या जात असून मेळघाट मधे एक शाश्वत रोजगार मिळवून देण्यास योजनेने प्रभावी भुमिका पार पाडली आहे.

▪ **मगांराग्रारोह योजनेचे कोरकू आदिवासींचे स्थलांतर थांबविण्यामध्ये योगदान–**

उपरोक्त मुदयाचे विश्लेषण मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून कोरकू आदिवासींकडून संकलीत केलेल्या तथ्याच्या आधारे करण्यात आले आहे. तथ्य संकलन प्रत्यक्ष मगांराग्रारोह योजनेअंतर्गत ज्याठिकाणी काम चालू होते त्याठिकाणाला भेट देवून करण्यात आले होते.

**1. मगांराग्रारोह योजनेत सहभागी लाभार्थ्यांचा वयोगट–**

प्रस्तूत शोध निबंधासाठी एकूण 20 उत्तरदात्यांची निवड करण्यात आली होती. योजनेत सहभागी उत्तरदात्यांचा वयोगट असे दर्शवितो की, बहुतांश म्हणजेच 60 टक्के उत्तरदाते प्रौढ वयागटातील असून, फार कमी (10 टक्के) उत्तदाते युवा वर्गातील होते. त्यातुलनेत जेष्ठ नागरिकांचे प्रमाण अधिक म्हणेज 30 टक्के आढळून आले.

**2. लिंग–**

मगांराग्रारोह योजनेमध्ये सहभागी लाभार्थ्यांचे लिंग अभ्यासले असता असे दिसून आले की पुरूषांच्या तुलनेत महिलांचा सहभाग अधीक प्रमाणात आहे. पुरूषांचे प्रमाण 40 टक्के होते. तर महिलांचे शेकडा प्रमाण 60 आढळून आले.

**3. शिक्षण –**

अध्ययनात समाविष्ट एकूण 20 उत्तरदात्यांपैकी 16 उत्तरदाते अशिक्षित आढळून आले, त्यांचे शेकडा प्रमाण 80 होते. तर 02 उत्तरदात्यांचे शिक्षण प्राथमिक पर्यंत झालेले होते, त्यांचे शेकडा प्रमाण 10 होते. तसेच 02 उत्तरदात्यांचे शिक्षण हे औपचारीक शाळेत झालेले नसून त्यांना केवळ लिहीता, वाचता व स्वाक्षरी करता येत होती. शिक्षण झालेल्या व्यक्तींमध्ये वयोगटाच्या आधारे विचार करता ते युवा वर्गातील म्हणजेच 18 ते 35 या वयोगटातील होते. केवळ लिहीता–वाचता येणाऱ्या उत्तदात्यांचा वयोगट 36 ते 45 असून अन्य वयोगटातील उत्तदाते निरक्षर होते.

**4. योजनेपुर्वी स्थलांतराची स्थिती व स्थलांतराचा कालावधी–**

मेळघाट मध्ये मगांराग्रारोह योजना सन 2008 मध्ये सुरू झाली असून त्यापुर्वी स्थलांतराची स्थिती दर्शवितांना जवळपास 90 टक्के उत्तरदाते रोजगाराच्या शोधात स्थलांतर करीत होते. स्थलांतर करण्यामागचे मुख्य कारण स्थानिक ठिकाणी रोजगार नसल्यामुळे स्थलांतर करीत होते. स्थलांतराचा कालावधी असे दर्शवितो की, 70 टक्के उत्तदाते वर्षातील 7 ते 8 महिने स्थलांतर करीत होते. तर 20 टक्के उत्तरदाते 5 ते 6 महिने व 10 टक्के उत्तरदाते 3 ते चार महिने स्थलांतर करीत होते.

### 5.स्थलांतरीत काळात रोजगाराचे क्षेत्र–

अध्ययनात समाविष्ट 70 टक्के उत्तरदाते कृषी क्षेत्रात रोजगार प्राप्त करीत होते. तर 20 टक्के उत्तदाते बांधकाम क्षेत्रात व 10 टक्के उत्तरदाते चौकीदारी, घरकाम अशा क्षेत्रात काम करीत होती.

### 6.स्थलांतराचे ठिकाण–

बहुतांश उत्तरदाते (70 टक्के) ग्रामीण भागात स्थलांतर करीत होते. तर फार कमी म्हणजेच 30 टक्के उत्तरदाते शहरामध्ये स्थलांतरीत होत होते.

### 7.योजनेनंतर स्थलांतराची स्थिती–

जवळपास 90 टक्के उत्तरदात्यांच्या मते योजनेच्या अंमलबावणीनंतर स्थलांतर थांबले असून 10 टक्के लोक अदयापही स्थलांतर करीत होते. जी लोक अदयापही स्थलांतर करीत होते त्यामध्ये शेती, तथा बंगल्यावर चौकीदार म्हणून काम करणाऱ्या लोकांचे प्रमाण होते.

### 8.योजनेअंतर्गत प्राप्त होत असलेला रोजगार–

योजनेचा प्रारंभ झाल्यापासून 90 टक्के उत्तरदाते स्थलांतर थांबले असल्याचे दर्शवित असून जवळपास सर्वच उत्तरदाते वर्षातून 90 दिवसापेक्षा अधिक दिवस योजनेमध्ये रोजगार प्राप्त होत असल्याचे दर्शवितात.

### 9.योजनेच्या अंमलबजावणी विषयी समाधानता–

योजनेची अंमलबजावणी प्रभावी पणे होत असून योजना कोरकू आदिवासींचे रोजगाराच्या शोधात होणारे स्थलांतर थांबविण्यात यशस्वी ठरली असून योजनेच्या अंमलबजावणी विषयी सर्वच उत्तरदाते समाधानी आढळून आले.

### 10.स्थलांतर कालावधीत समस्या–

स्थलांतरीत काळात अनेक समस्यांना सामारे जावे लागत असल्याचे मत उत्तरदात्यांनी व्यक्त केले. त्यामध्ये कुटुबातील वृध्द व्यक्ती, लहान मुलांना गावाकडे सोडून जाणे, आरोग्याची समस्या, लहान मुलांचे शैक्षणिक नुकसाण हया प्रमुख समस्या कथन करण्यात अल्यात.

### 11.स्थलांतर थांबल्यानंतर कुटुंबावर तथा अन्य घटकांवर पडलेला प्रभाव–

स्थलांतर थांबल्यामुळे वृध्द व्यक्तींकडे लक्ष देता येणे शक्य झाले. मुलांचे शैक्षणिक नुकसान थांबले, आरोग्यविषयक समस्या कमी झाल्यात, चांगला आहार घेता येणे शक्य झाले, आजारपणात उपचार घेता येणे शक्य झाले. बाहेरगावी होत असलेले आर्थिक शोषण, महिलांचे शोषण थांबले, आर्थिक खर्च कमी झाला अशा प्रकारचा प्रभाव पडल्याचे आढळून आले. त्यासोबतच आर्थिक विकास झाला असून त्यामाध्यमातून अनेक वस्तूंची खरेदी केल्या गेल्याचे मत नोंदविण्यात आले.

### ▪ निष्कर्ष–

मगांराग्रारोह योजना प्रारंभ होण्यापुर्वी मेळघाट मधील कोरकू आदिवासींना रोजगाराच्या शोधात स्थलांतर करावे लागत होते. स्थलांतरीत काळात त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत होता. मगांराग्रारोह योजनेमुळे स्थानिक पातळीवर रोजगार मिळत असल्यामुळे कोरकू आदिवासींनी योजनेतील कामाला प्राधान्य दिले. त्यातून त्यांचे स्थलांतर थांबले असून स्थलांतर काळात होत असलेले शोषण त्यामुळे पुर्णपणे थांबुन त्यांचा विकास होत आहे.

### ▪ संदर्भ ग्रंथ सुची

1. दिक्षित प्रांजळ (2008).रोहयोकडून मग्रारोहयोकडे. पुणे. प्रयास
2. देसले, किरण.(2016). आर्थिक व सामाजिक विकास. जळगाव. दिपस्तंभ प्रकाशन
3. देशमुख भालचंद्र (2018).रोजगाराचा अधिकार व सामाजिक अंकेक्षण. अमरावती. आधार प्रकाशन
4. नाडगोंडे गुरूनाथ.(1999).सामाजिक संशोधन पध्दती. कोल्हापूर. फडके प्रकाशन

5. मांडवगडे संदिप. (2011). ग्रामीन विकासात रोजगार हमी योजनेची भुमिका.*इंटरडिसीप्लीनरी ॲप्रोच टू रूरल डेव्हलपमेंट* सोव्हिनियर, वर्धा. श्रीकृष्ण जाजू ग्रामीण सेवा महाविदयालय. दि. 23–24 डिसेंबर. पृ.376–378
6. Nagesha, B. (2019). Impact of MGNREGA on Rural Labour Migration-A Study. *International Journal of Science and Research (IJSR)* .Volume 8 Issue 2, February, PP.791-93
7. Naomi. Jacob. (2008). The Impact of NREGA on Rural-Urban Migration: Field survey of Villupuram District, Tamil Nadu. CCS Working Paper No. 202 Summer Research Internship Programme 2008 Centre for Civil Society



**मुकुंद पांडुरंगजी देशमुख**
**असिस्टंट मॅनेजर, करितास इंडीया, न्यु दिल्ली.**